# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २७१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०५/२०१८

**१) ईलेक्ट्रीक पोलवरील ॲल्युमीनीयम वायरची चोरी:–**

दिनांक १७/०५/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील सर्पेवाडा शिवारातील महावितरण कंपनीचे ४ ईलेक्ट्रीक पोलवरील ०.२४ कि.मी. चे ४ नग ॲल्युमीनीयम ३ फेस वायर कि.२०,०००/रु. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी अनुप योगीराज भुते वय. ३० वर्ष वरीष्ठ तंत्रज्ञ विज वितरण केंद्र करडी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) गोट फार्म मधील बक–याची चोरी:–**

दिनांक २२/०५/२०१८ चे ०२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे नावाने भोजापुर येथील शेत शिवरात असलेल्या गोट फार्म मधुन १ काळया रंगाचा बकरा वजन अंदाजे १५ किलो कि. ५,०००/रु. चा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी शैलेन्द्रसिंह सुभदेवसिंह चव्हाण वय ३७ वर्ष रा.सरस्वती निवास बैरागी वाडा भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाढवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) सोन्या चांदीचे दागीने व नगदी पैश्याची चोरी:–**

दिनांक २२/०५/२०१८ चे १९.०० ते दि. २३/५/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. संगीता लक्ष्मण उराडे वय ४० वर्ष रा. संजय गांधी वार्ड माकडे मोहल्ला भंडारा ही तीचे पती सोबत मुलाची प्रकृती खराब असल्याने सा. रू. भंडारा येथे गेली असता, सा.रू. भंडारा येथे रात्रभर थांबुन दि. २३/५/२०१८ चे १०.०० वाजता फिर्यादीचे पती घरी आले असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचे दरवाज्याचा पट वर करून आत प्रवेश करून बेडरूम मधील लोंखडी आलमारीचे लॉक तोडुन १ सोन्याचा डोरला व १४ मनी वजन ५ ग्रॅम कि. १०,०००/रु. व चांदीचे २ तोडयाचे पायातील जोडवे कि. ५००/रु. लहान पॉकीटात ठेवलेले नगदी ७,०००/रु. असा एकुण १७,५००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) सिलींग फॅनची चोरी:–**

दिनांक २२/०५/२०१८ ते दि. २३/५/२०१८ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी डॉ. संजय शेषराव तांडे वय ५८ वर्ष रा. समर्थ नगर लाखनी पशुधन विकास अधीकारी लाखनी यांचे सरकारी निवासस्थातील छताला लावलेली ३ ओरीयंट कंपनीचे सिलींग फॅन कि. २४,०००/रु. चे कोणीतरी अज्ञात चोराने निवासस्थानाचे दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून माल चोरून नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**५) संगनमत करून प्रापर्टीचे वादावरून भांडण करून विटा व दगडी चिपा मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २३/०५/२०१८ ते ०६.४५ वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून जखमी शिवकुमार मंदुरकर यांचे सोबत प्रापर्टीचे वादावरून सार्वजनीक नळावर भांडण करून आरोपी क्र. १ ने थापड बुक्यानी मारहान केली व आरोपी क्र. २ ने वर मजल्यावरून जखमीस विटा, दगडी चिपा फेकुन डोक्यावर व पाटीवर मारून जखमी केल्याने फिर्यादी मनिष केशवराव कटनकर वय ४० वर्ष रा. महात्मा ज्योतीबा फुले वार्ड भंडारा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२३,३३८,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) टिप्परच्या धडकेत मुलाचा मृत्यु :–**

दिनांक २२/०५/२०१८ ते २१.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी गुरूदेव इंदु वानी वय ४८ वर्ष रा. वार्ड क्र. २ भुयार हा भुयार येथील बसस्थानकावर खर्रा घेण्यास गेला असता, त्याचा मुलगा प्रकाश वानी वय १० वर्ष हा त्याचे मागे रोड क्रॉस करून जात असता भागळी कडुन भिवापुर कडे जाणा–या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चलवुन जखमी प्रकाश यास गंभिर जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने पो.स्टे भिवापुर येथे ००/१८ कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. राहागंडाले याचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका.अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**७) इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २३/०५/२०१८ चे ०१.३० वाजता दरम्यान यातील मृतक सुखदेव लहानु मारबते वय ५० वर्ष रा. भेंडाळा याला अचानक उलटया झाल्याने त्यास औषधोपचारा करीता ग्रा.रू. पवनी येथे आणले असता, तेथील डॉ. नी तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी नितीन सुखदेव मारबते वय ३२ वर्ष रा.भेंडाळा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. कळपते हे करीत आहेत.

**८) इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक २३/०५/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील मृतक खांडेराव ऊर्फ राजु मंगल मते वय ४० वर्ष रा. बैरागी वार्ड भंडारा हा दारू पाणी पिवुन बस्थानक येथे राहत असुन नमुद घटना ता. ठिकाणी मृतक हा बसस्थानक भंडारा येथे मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी श्रीमती अनुबाई मंगल मते वय ६५ वर्ष रा. बैरागीवाडा भंडारा हिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहावा. गिन्हेपुंजे हे करीत आहेत.

**९) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिनांक ०८/०५/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील मृतक विजय रामचंद्र उराडे वय ४५ वर्ष रा. गोंडसावारी याने जास्त दारू पिल्याने व जेवन न केल्याने त्याची प्रकृती खराब होवुन त्यास प्रथम उपचारा करीता डॉ. झवर येथे भरती करून उपचार करून पुढील उपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता, उपचारादरम्यान मरण पावल्याने पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. काटेखाये यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहावा. पठाण हे करीत आहेत.

**१०) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २३/०५/२०१८ चे ०२.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालक त्याचे ताब्यातील ट्रक हा दारू पिवुन दारूचे नशेत जिल्हा परिषद चौक भंडारा येथे चालवीतांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. गिन्हेपुंजे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजयांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**११) अवैध हातभट्टी ,देशी दारु/ जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २३/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, वरठी, तुमसर व लाखांदुर येथे हातभट्टी, देशी दारू/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १,१५०किलो सडवा मोहा पास किंमती ४२,५००/–रु. व ४ लिटर ८६० कि. १३,५०/रु. तसेच जुगारातुन किंमती ३५७/–रु. असा एकुण किंमती ४४,२०७/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २४/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– १२ ईतर वाहनांवरती – १०९ केसेस करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.